जननायक बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार येथील विद्यार्थिनींसाठी वसतिगृहाकरिता इमारत भाडेतत्त्वावर घेण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांकः इभाडे-०७२६/प्र.क्र.२६५/ई-१७७९११२/प्रशा-२
गो.ते. रुग्णालय परिसर, नवीन संकुल, लोकमान्य टिळक रोड,
मुंबई - ४००००१
तारीख: १३ ऑगस्ट, २०२६

वाचा :-

१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र.एमईडी-२०१६/प्र.क्र.१८५ १६/शिक्षण-१,दि. ११.०५.२०१७
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दिनांक १७.०४.२०१५
३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन आदेश क्र. अप्रक-२०२४/प्र.क्र.३२/२४/आस्था, दिनांक १५ एप्रिल, २०२४
४) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र :DMER-१२०१८/२/२०२६-EST-EDU, दि. ०१.०७.२०२६

प्रस्तावना :-

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील जननायक बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार येथील वसतिगृह इमारतीचे बांधकाम पूर्ण होण्यास लागणारा कालावधी विचारात घेता, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थिनींच्या निवासाची तात्पुरती व्यवस्था करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या भाडेदरानुसार खाजगी इमारत भाडेतत्त्वावर घेण्याचा प्रस्ताव आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांनी संदर्भ क्र. ४ वरील पत्रान्वये शासनास सादर केला आहे. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या (NMC) मानकांची पूर्तता होण्याच्या दृष्टीने वापरासाठी तयार असलेली खाजगी इमारत सदर महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थिनींच्या निवासासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या दराने भाडेतत्त्वावर घेण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील जननायक बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेशित होणाऱ्या

विद्यार्थिनींच्या वसतिगृहाची तातडीने व्यवस्था करण्याच्या दृष्टीने, खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे खाजगी इमारत सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या प्रति महिना रु. ६२,५२३/- (जीएसटी व स्थानिक कर वगळून) या दराने भाडेतत्त्वावर घेण्यास तसेच त्याकरिता येणाऱ्या खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे.

इमारत मालकाचे नाव व पत्ता	क्षेत्रफळ (चौ.मी.)	सा.बां.वि. निश्चित प्रतिमाह भाडे (रु.)	वार्षिक खर्च (जी.एस.टी. व स्थानिक कर वगळून) (रु.)
श्रीमती सरला संतोष राठोड, प्लॉट क्र.६, सर्व्हे नं.७०/२, यशोधन पार्क, दुधाळे शिवार, नंदुरबार, ता.जि.नंदुरबार	४४३.२३	६२,५२३	७,५०,२७६

२. सदर इमारतीचा भाडेकरार अधिष्ठाता, जननायक बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार यांनी संस्थास्तरावर प्रचलित नियमांनुसार करावा.

३. सदर भाडेकरार इमारत प्रत्यक्ष ताब्यात उपलब्ध करून दिल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल. सदर कराराची मुदत तीन वर्षे अथवा शासकीय वसतिगृहाची इमारत उपलब्ध होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीपर्यंत राहील. अपरिहार्य कारणास्तव मुदतवाढ आवश्यक असल्यास ती शासनाच्या पूर्वमान्यतेने देता येईल.

४. सदर इमारतीचे प्रतिमाह भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भाडेमूल्यांकन अहवालानुसार वेळोवेळी सुधारित करण्यात येईल व त्यानुसार देय राहील.

५. प्रतिमाह भाडे तसेच त्यावरील लागू जीएसटीचा खर्च जननायक बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार या संस्थेच्या (२२१० K४३५) या लेखाशिर्षांतर्गत "(१४) भाडेपट्टी व कर" या उद्दिष्टाखाली उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: विअप्र-२०२६/प्र.क्र.२२/विनियम, दिनांक ११.०८.२०२६ अन्वये तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उप विभाग -१, अनुक्रमांक-१० अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारान्वये हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१३१८१६४५९५५१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने .

MAHADEO GIRDHARI JOGDAND

Digitally signed by MAHADEO GIRDHARI JOGDAND
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDD,
2.5.4.20=0477D837DC0B00FC2CBD45D17D07C625C3417378F97D493A8A277FAA29F65459, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C1D08CFDEE92DA209D709F5456D9EDE95236B8A8E7E2A2801B8FED03DCF793D3, cn=MAHADEO GIRDHARI JOGDAND
Date: 2026.08.13 18:48:57 +05'30'

(म.गि.जोगदंड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार - १/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र,मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
४. अधिष्ठाता, जननायक बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार.
५. जिल्हा कोषागार अधिकारी, नंदुरबार.
६. श्रीमती सरला संतोष राठोड,, नंदुरबार.
७. निवडनस्ती (प्रशा-२).